**नि. फौ. ख. क्र.२२४/२०२१**

सरकार वि. बळवंत पवार

**नि.क्र.१९**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– पोपट अंकुश कोळी,</u>**

वय– ३० वर्षे, व्यवसाय–वनरक्षक,

रा.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. लोहकरे, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

घटना दि.०३ एप्रिल २०१८ रोजी घडली. वन जमिनीमध्ये आरोपींनी जेसीबीने जमीन खोदून पाईपलाईन केली होती. त्यानंतर मी व माझे वरिष्ठ अधिकारी यांनी दि.०४ एप्रिल २०१८ रोजी दुपारी १२ ते १ च्या दरम्यान पाहणी केली. पाहणीमध्ये आरोपींची जमीन वन जमिनीलगत असल्याचे आढळून आले. तसेच आरोपींनी वन जमिनीमध्ये पाईपलाईन केल्याचे आढळले. त्यानंतर आम्ही सदर पाईपलाईंन खंडीत केली व आरोपींविरुध्द वन अपराध पहिले प्रतिवृत्त दाखल केले. आता मला मी दिलेली पहिले प्रतिवृत्त दाखविले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.२०</u>** देण्यात येते. वरिष्ठ कार्यालयाला गुन्हा दाखल केल्याचे कळविले. वरिष्ठ अधिका–यांनी गुन्हयाचा तपास केला. पाईपलाईन गेलेला गट नंबर हा गट नं.१९७ व मौजे शेळगांव मधील गट नं.१८९७ असा होता. मी आरोपींना ओळखतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. आरोपी क्र.३ गैरहजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.आर. के. शेळके, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

इंदापूर तालुक्यातील वनक्षेत्र हे ब–याच गावांमधून म्हणजेच रूई, कळस, कडबनवाडी, न्हावी, व्याहाळी, लोणी देवकर, शेळगांव, निमगांव इ. गेलेले आहे. वरील गावातील हजारो शेतक–यांच्या पाईपलाईन वन जमिनीतून गेल्यात का कसे मला सांगता येणार नाही. आरोपींनी जमीन खोदल्याचे व पाईपलाईन केल्याचे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. मी स्थानिक रहिवाश्यांचे जबाब घेतले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ संशयावरून आरोपींच्याविरुध्द खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी जेसीबीने उकरून वन जमिनीमध्ये पाईपलाईन केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी गुन्हा कबूल केल्याचे मी खोटे सांगत आहे. पाईपलाईन संदर्भांत लेखी पुरावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्याविरुध्द खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.११/११/२०२४**